गोपनीय/अतितात्काळ

क्र.पोमसं/२/१०(५)/स.सा.बदल्या-२०१७/१४/२०१७.
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,**
**शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,**
**मुंबई- ४०० ००१.**
दिनांक :- 2L /०७/२०१७.

**संदर्भ** :- शासन आदेश, गृहविभाग, क्र. रापोसे-१७१७/प्र. क्र. १७०/पोल-१ अ, दि.२६/०७/२०१७.

**विषय** :- पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदलीबाबतचे शासन आदेश कळविण्याबाबत.

* * * * *

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र अध्यादेश क्र. ३, दिनांक १ फेब्रुवारी, २०१४, मधील कलम २२ न (२) मधील तरतुदींच्या अनुषंगाने, पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) संवर्गातील अधिका-यांच्या बदल्याबाबतचे संदर्भाधिन शासन आदेश याव्दारे कळविण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नांव | सध्याच्या नियुक्तीचे ठिकाण | नवीन नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती दिपाली मोहन खन्ना | उपविभागीय पोलीस अधिकारी, आमगांव उपविभाग, गोंदिया | पोलीस उप अधीक्षक, (मुख्यालय), गोंदिया |

२. घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की,

**अ.** संदर्भाधिन शासन आदेशांच्या अनुषंगाने संबंधीत घटक प्रमुखांनी बदली झालेल्या अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यमुक्त करून, तसा अनुपालन अहवाल सत्वर या कार्यालयास सादर करावा.

**आ.** ज्या ठिकाणी निवडणूक संबंधाने आचारसंहिता लागू आहे, त्या ठिकाणांच्या अधिकाऱ्यांना आचारसंहिता समाप्त झाल्यानंतर कार्यमुक्त करावे.

**इ.** बदलीवरील नवीन नियुक्तीच्या ठिकाणासंदर्भात मा.न्यायालयाचे, अथवा मा. न्यायाधिकरणाचे स्थगिती आदेश असल्यास, ते विचारात घेऊन पुढील कार्यवाही करावी.

**ई.** सदर बदलीवरील नवीन नियुक्तीच्या ठिकाणी कार्यमुक्त करण्याबाबतच्या आदेशांची प्रत संबंधीत अधिका-यांना **व्यक्तिश:** अदा करुन ती त्यांना प्राप्त झाल्याबाबत त्यांची दिनांकासहित स्वाक्षरी घ्यावी, व ती पोच या कार्यालयास पाठवावी.

उ. उपरोक्त आदेशांच्या अनुषंगाने संबंधीत अधिकाऱ्यांना बदलीवर **विनाविलंब कार्यमुक्त** करुन त्यांनी त्यांच्या नवीन नियुक्तीच्या पदावर तातडीने हजर होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करुन अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

ऊ. सदर बदलीच्या आदेशांमुळे ज्या जागा रिक्त होणार आहेत, त्या ठिकाणांचा कार्यभार संबंधीत घटक प्रमुखांनी त्यांच्या घटकातील इतर पोलीस उपअधीक्षकांकडे सोपवावा.

ए. उपरोक्त आदेशाच्या अनुषंगाने संबंधीत अधिका-यांना त्यांच्या बदलीवरील नवीन नियुक्तीच्या ठिकाणी कार्यमुक्त केल्याची, तसेच ते नवीन नियुक्तीच्या ठिकाणी रुजू झाल्याची तारीख तात्काळ या कार्यालयास कळवावी. तसेच, ते जर बदलीवर नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाले नाहीत तर तसे या कार्यालयास कळवावे, आणि त्यांच्याविरुध्द या कार्यालयाच्या क्र. २/५५०७, दिनांक १६/०९/१९८३, ११/०१/१९८४ व दि. १०/०२/१९९१ तसेच क्र. पोमसं/३/५५०७/६/९७, दिनांक १३/०२/१९९७ च्या परिपत्रकातील सूचनांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

**( राजकुमार व्हटकर )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

पोलीस अधीक्षक, गोंदिया

प्रत,

पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.

प्रत सविनय सादर :-

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
( **लक्षवेध :- श्री. प्र. मो बलकवडे,** कक्ष अधिकारी)

प्रत:-

महालेखाकार-१ (लेखा व अनुज्ञेयता) / महालेखाकार-२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर (सस्नेह).
जिल्हा कोषागार अधिकारी, गोंदिया
पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, मुंबई.
कार्यासन अधिकारी, का. क्र. २-अ, ९, ३६, व ४०.
**पोलीस उपअधीक्षक, संगणक कक्ष**

२. प्रस्तुत बदलीचे आदेश " **पोलीस उपअधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) बदली**" या शिर्षाखाली महाराष्ट्र पोलीस दलाच्या संकेत स्थळावर पुढील पंधरा दिवसांसाठी प्रसिध्द करावे.

राज्य पोलीस सेवेतील पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या संवर्गातील अधिकाऱ्यांची बदलीने पदस्थापना...

# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

शासन आदेश क्र.रापोसे-१७१७/प्र.क्र.१७०/पोल-१(अ)
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :-२६ जुलै, २०१७.

**शासन आदेश** :-

महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) अधिनियम, २०१४ च्या कलम २२ (न) मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्वमान्यतेने पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या संवर्गातील खालील पोलीस अधिकाऱ्याची बदली त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नांव | सध्याच्या नियुक्तीचे ठिकाण | नवीन नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती दिपाली मोहन खन्ना | उपविभागीय पोलीस अधिकारी, आमगांव उपविभाग, गोंदिया | पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), गोंदिया |

२. वर नमूद अधिकाऱ्याच्या बाबतीत, तसेच त्यांच्या नवीन पदस्थापनेच्या बाबतीत, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण अथवा अन्य मा. न्यायालयाचे आदेश असल्यास, ते विचारात घेऊन तात्काळ पुढील कार्यवाही करण्यात यावी.

३. संबंधित अधिकाऱ्यास बदलीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी महासंचालक व पोलीस महानिरीक्षक यांनी कार्यमुक्त करण्याबाबतची आवश्यक कार्यवाही करावी व संबंधित अधिकारी यांनी बदलीच्या ठिकाणी रुजू होऊन तसा अहवाल शासनास सादर करावा.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१७०७२६१६५७१४७३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Kailas A. Gaikwad

Digitally signed by Kailas A. Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a708cc03eb46cd241a604d42bb, cn=Kailas A. Gaikwad
Date: 2017.07.26 17:02:28 +05'30'

**(कैलास गायकवाड)**
**उप सचिव, गृह विभाग**

**प्रति,**

महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :-

१. महालेखापाल-२(लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. मा. राज्यमंत्री (गृह) (शहरे/ग्रामिण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव (अपील व सुरक्षा) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव (विशेष) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. पोलीस अधिक्षक, गोंदिया
८. जिल्हा कोषागार अधिकारी, गोंदिया.
९. संबंधित अधिकारी (पोलीस महासंचालक यांचेमार्फत).
१०.निवडनस्ती / पोल-१(अ).